# महापारेषण
# ‘‘स्वारस्य अभिरूची’’- विस्तारीत मुदतवाढ

महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित हयांचे अंतर्गत मौजे वाघदरी, गोगांव, तालुका- अक्कलकोट जिल्हा-सोलापूर येथे महापारेषण कंपनीचे २२०/१३२ केव्ही उपकेंद्राचे बांधकाम प्रस्तावित आहे. त्याकरिता खाजगी मालकी हक्काची जमीन अंदाजे २०० x २०० चौरस मीटर मापाची ४ हेक्टर (अंदाजे १० एकर) जड वाहतूक होण्यायोग्य रस्त्यालगत जमिनीची आवश्यकता आहे. उपरोक्त जमीन शक्यतोवर १३२ के.व्ही. उपकेद्र गोगांव पासून १० कि.मी. अंतराच्या आत असावी. वरील वर्णनाची जमीन विक्री करण्यास इच्छुक असणा-या जमीन धारकांनी अथवा जमीन कुलमुखत्यार धारकांनी खाली दिलेल्या संबंधित कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह स्वारस्य अर्ज निम्ननिर्देशित कार्यालयास दोन वेगळया लिफाफयामध्ये सादर करावे.

१. अदयावत ७/१२ उतारा
२. खसरा नकाशा गाव नकाशासाहित
३. गाव नमुना ८ अ
४. टोच नकाशा (लोकेशन मॅप)
५. जमीन धारकाने धारण केलेल्या जमिनीचा एकूणे क्षेत्रफळ दर्शविणारा नकाशा
६. जमिनीची लांबी, रूंदी व एकूण क्षेत्रफळ दर्शविणारा नकाशा
७. जमीन जर कोणत्याही प्रकल्पात किंवा इतर कारणात्सव आरक्षित असल्यास जिल्हाधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र किंवा जिल्हाधिकारी परवानगीसाठी त्यांच्या कार्यालयात दाखल केलेल्या सेतू मार्फत अर्जाची प्रत अथवा पुरावा.
८. जमीन मालकास सोबत केलेला कुलमुखत्यात नोंदणीकृत दस्त प्रत
९. जमिनीचे दर प्रती एकर-सोबतच्या परिशिष्ट-ब मध्ये नमुद करुन

जमिन धारकाने अथवा जमिन कुलमुखत्यार धारकाने आपले स्वारस्य अर्ज, दिनांक- २५.०५.२०२२ पर्यंत १६:०० वेळेपर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. तरी अर्ज पाठविण्याची मुदतवाढ दिनांक- ०६.०६.२०२२ पर्यंत १६:०० पर्यंत वाढविण्यात येत आहे. दोन स्वतंत्र मोहरबंद लिफाफ्यामध्ये वरील क्रं १ ते ८ प्रमाणे एका लिफाफ्यामध्ये जमीनीचे कागदपत्रे व वरील क्रं ९ प्रमाणे दुस-या लिफाफ्यामध्ये परिशिष्ट-ब असे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) हयांच्या खाली दिलेल्या पत्यावर स्वहस्ते किंवा प्रतिनिधी मार्फत पोहचतील अशा बेताने पाठवावे. कोणत्याही कारणामुळे उशिरा प्राप्त होणारे स्वारस्स अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. कारण न देता कोणतेही किंवा सर्व स्वारस्य अर्ज नाकारण्यात येण्याचा हक्क हस्ताक्षर कर्त्या अधिकार्याने राखून ठेवला आहे.

संपर्क अधिकारी प्रिती शिंदे प्रभारी अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्था) सोलापूर. मोबाईल नंबर-८८५६०१०३१४. अधिक माहितीसाठी या संकेत स्थळावर संपर्क करा- www.mahatransco.in

**टीप**- लिफाफा क्रं-२ मध्ये दयावयाचा परिशिष्ठ ‘ब’ www.mahatransco.in या संकेत स्थळावरुन घ्यावा.

कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
अउदा.बां.नि.व.सु., विभागीय कार्यालय,
वैशंपायन वैदयकिय महाविदयालय शेजारी,
रंगभवन, सोलापुर – ४१३००६

# महापारेषण

## परिशिष्ट-ब

**कामाचे नांव**- प्रस्तावित २२०/१३२ के.व्ही. उपकेंद्र उभारणीसाठी वाघदरी येथे आवश्यक खाजगी जमिन धारकाकडून खाजगी वाटाघाटी साठी निविदा प्राप्त करणेबाबत.

| अ.क्रं. | जमिन मालकाचे नांव | गांव व तालूका | ७/१२ उता-यावरील क्षेत्र | प्रती एकर दर रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| | | | | |

१. नोंदणी व मुद्रांक शुल्क जमिन खरेदीवेळी महापारेषण मार्फत भरला जाईल.
२. सरकारी कर चालु नियमाप्रमाणे जसे शेतसारा, महसुल कर, वस्तु व सेवा कर, आयकर इत्यादी खरेदी तारखे पर्यंत लागु असलेले देयके जमिन मालकाने भरावा लागेल.
३. तात्पुरते शेड, स्थायी बांधकाम, विहिर, पिक, झाडे, बांध इत्यादी यांचे कोणतेही अतिरिक्त भरपाई रक्कम दिली जाणार नाही.
४. नियोजित जमिन ही कोणत्याही सरकारी/ बॅंक/ वित्तीय संस्था किंवा व्यक्ती यांच्याकडे गहाण, तारण नसावी.
५. भूसंपादन प्रक्रियेदरम्यान महापारेषणतर्फे आगाऊ/अंतिरिम रक्कम दिली जाणार नाही. महसूल अस्थापनेमार्फत निश्चित करण्यात आलेली अंतिम देय रक्कम हि संबंधित भूधारकाच्या बॅंक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

भुधारकची/ कुलमुखत्यारची स्वाक्षरी

भुधारकची/ कुलमुखत्यारची नाव

स्थळ :-

दिनांक :-